राज्यकर उपायुक्त (जनसंपर्क) यांचे कार्यालय,
ई-विंग, पहिला मजला, वस्तू व सेवा कर भवन,
माझगांव, मुंबई-४०० ०१०

# महाराष्ट्र शासन

## वस्तू व सेवाकर विभाग

## निविदा सुचना

वस्तू व सेवाकर भवन माझगाव, बांद्रा, एम.टी.एन.एल लवलेन व नरीमन पॉईंट कार्यालयातील रद्दी कचरा उचलण्यासाठी निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा वजन पध्दतीने देण्यात येईल.

| अ.क्र | तपशील | कालावधी | वेळ |
|---|---|---|---|
| १ | निविदा सुचना प्रसिध्दी | दि. ०६ / १० /२०२३ | ११.०० am |
| २ | निविदा स्विकृतीची शेवटची तारीख | दि. १३/ १० /२०२३ | १५.०० pm |
| ३ | निविदा उघडण्याची तारीख | दि. १६ / १० /२०२३ | १५.३० pm |

| अनु क्र. | निविदेचे वर्णन | ईसारा रक्कम | निविदा किंमत |
|---|---|---|---|
| १. | रद्दी/कचरा उचलणेबाबत | राष्ट्रीयीकृत बॅंकेचा धनाकर्ष (डिडि) (Establishment officer(PRO & Security) Mazgaon, Mumbai यांच्या नावे) रु. ५००००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार फक्त) | रु. १०००/- |

१. राज्यकर उपायुक्त कार्यालय (जनसंपर्क), ई-विंग, पहिला मजला, वस्तू व सेवाकर भवन, माझगाव, मुंबई-४००० १० येथे प्रत्यक्ष मोहोरबंद लिफाफ्याद्वारे दरपत्रक सादर करण्यात यावे.
२. दरपत्रक खालील दिलेल्या नमुन्यात सादर करण्यात यावे.

| अ.क्र. | रद्दी | प्रतिकिलो दर |
|---|---|---|
| १. | **पेपर, धारीण्या इतर रद्दी कचरा** | |

३. दरपत्रकामध्ये प्रति किलो उच्चतम दर (H१) सादर करणा-या निविदाकारास रद्दी कचरा उचलण्याचे कंत्राट दिले जाईल.

४. कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता स्वीकारणे अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मा. राज्यकर उपायुक्त (जनसंपर्क), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी स्वतःकडे राखून ठेवला आहे. त्यासंबंधी कोणतीही चर्चा केली जाणार नाही अथवा स्पष्टीकरण दिले जाणर नाही.

५. निविदा मंजूर केल्याचे आदेश काढल्यानंतर यशस्वी निविदाधारकास / ठेकेदाराला कार्यादेश मध्ये नमूद केलेल्या मुदतीत रद्दी कचरा उचलावा लागेल.

६. सदर निविदाकाराने रद्दी कच-याचे वर्गीकरण करणे व जतन करावयाच्या धारीण्या अभिलेख शाखेकडे पाठविणे. तसेच नष्ट करावयाच्या धारिण्या तसेच कागदपत्रे यांची योग्य ती विल्हेवाट लावणे.

**७. सदर कामासाठी आवश्यक असणारे कुशल तसेच अकुशल कामगार, त्यासाठी आवश्यक असणारे पॅकींग सामान व वाहतूक खर्च या सर्व गोष्टींना अंतर्भूत करून निविदाकाराने प्रति किलो दर सादर करावा.**

८. पात्र निविदाधारकास कायद्याप्रमाणे लागू होणारे सर्व कर स्वत: भरण्याची जबाबदारी स्विकारावी लागेल तसेच उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे सर्व अटी मान्य असल्यास निविदेमध्ये सहभाग घ्यावा.

अधिक माहितीसाठी आस्थापना अधिकारी, जनसंपर्क व सुरक्षा विभाग, माझगांव, मुंबई -४०००१० यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. दूरध्वनी क्रमांक - २३७६०००१

दिनांक: ०६ / १० /२०२३

**स्वाक्षरीत/-**
**जनार्दन आटपाडकर,**
**राज्यकर उपायुक्त, (जनसंपर्क)**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**